# Best Practice No:02

**1. Tile of practice:-** Serve the nation build the nation

**2. Objective:-**

- To provide a suitable environment for youth to make a carrier in the Armed forces through NCC.
- To guide students regarding jobs in Armed forces.

**3. The Context:-** Our institute also situated in the territory of army base area called Deolali Cantonment Board. Deolali camp has an important army base area. Deolali camp area one of oldest Indian military centre in the country stated the Air force station, the school of Artillery of the Indian army and other important establishment in this region.

**4. The Practice:-**

**4.1 Guidance through NCC officers**

The NCC unit aims at developing characters, comradeship, discipline, a secure outlook, the spirit of adventure and ideals of selfless service among students. Commanding officer, Lieutenant colonel and other administrative officers visited and guided our students.





**Photo plate :** Administrtive officer Colonel Ravi Vyas 7TH MaharashtraBn. NCC Nashik visited NCC unit on 24th November 2022.

**5. Evidence of success:-** Due to guidance and motivation of various commanding officer our four students were selected as Agniveer and Suraj Chaudhari selected for the post of Lieutenant General.




**Photo plate :** Felicitation of our alumni Suraj Chaudhari selected for the post of Lieutenant General.



## संरक्षण विभागात नोकरीच्या संधी : ले. चौधरी

दे. कॅम्प | दि. १२ वार्ताहर

जीवनात यशस्वी होण्यासाठी कठोर मेहनत व परिश्रम करावे लागतात. ध्येय निश्चित करून ते गाठण्यासाठी जीवाचे रान करावे लागते. युवकांना संरक्षण विभागात मोठ्या संधी उपलब्ध असून त्याचा नीट अभ्यास करून परीक्षेला सामोरे गेल्यास यश निश्चित प्राप्त होते, असे प्रतिपादन लेप्टनंट सुरज चौधरी यांनी केले.

येथील एसव्हीकेटी महाविद्यालयात माजी विद्यार्थी सुरज चौधरी यांची लेप्टनंटपदी निवड झाल्याबद्दल सत्कार, विद्यार्थी संवाद आणि मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सत्काराला उत्तर देतांना ले.चौधरी बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एस. एस. काळे, माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष वैभव पाळदे, गजीराम मुठाळ, उपप्राचार्य डॉ. सोपान एरंडे, दिलीप जाधव, एन. के. सोनवणे, सुधाकर जाधव, माणिकराव गोडसे, प्रशांत धिंवेंदे आदी होते. ले. चौधरी पुढे म्हणाले की, भारतीय लष्कर व्यवस्थेत अनेक पदांची सेवासंधी उपलब्ध आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वाटचालीपासूनच प्रयत्न करावे. तसेच संधींचा योग्य अभ्यास करून त्या प्रमाणे वाटचाल केल्यास यश निश्चित मिळते. प्राचार्य डॉ. काळे यांनी प्रास्ताविकातुन चौधरी याचा आदर्शन विद्यार्थ्यांनी डोळ्यासमोर ठेवून स्वत:ला आकार द्यायला हवा. या वेळी लेप्टनंट चौधरी यांची उपप्राचार्य डॉ. सोपान एरंडे यांनी प्रकट मुलाखत घेतली. यात सुरजच्या जडणघडणीवर प्रकाशझोत टाकला.



## ध्येय निश्चित करून तपश्चर्या केल्यावर यश हमखास

### लेप्टनंट सूरज चौधरी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | देवळाली कॅम्प

ध्येय साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम अन् तपश्चर्या करावी लागते. असे ध्येय निश्चित करून तपश्चर्या केल्यावर कोणत्याही व्यक्तीला यश हमखास मिळते, असे प्रतिपादन लेफ्टनंट सूरज चौधरी यांनी केले.

देवळाली कॅम्प येथील श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयात शनिवारी (दि. १२) महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सूरज चौधरी यांची लेप्टनंटपदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे सत्कार आणि मुलाखतीचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एस. एस. काळे, माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष वैभव पाळदे, सरचिटणीस गजीराम मुठाळ, प्रशांत दिवंधे, उपप्राचार्य डॉ. सोपान एरंडे, उपप्राचार्य दिलीप जाधव, एन. के. सोनवणे आदी होते.

लेफ्टनंट चौधरी म्हणाले की, भारतीय लष्कर व्यवस्थेत अनेक पदांची सेवासंधी उपलब्ध आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीपासूनच प्रयत्न करावेत. प्राचार्य डॉ. काळे यांनी प्रास्ताविक केले. लेफ्टनंट चौधरी यांची उपप्राचार्य डॉ. एरंडे यांनी प्रकट मुलाखत घेतली. यात सूरजच्या जडणघडणीवर प्रकाशझोत टाकला. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत असताना लेप्टनंट चौधरी यांना अनेक विद्यार्थ्यांनी लष्करी पदभरती, पूर्वतयारी, मुलाखत यांसारख्या विषयांवर प्रश्न केले. त्याला यांनी सविस्तर उत्तरे दिली. डॉ. पुरुषोत्तम गांगुर्डे यांनी आभार मानले.




**Photo plate:-** Our 4 students selected as Aagniveer in Indian Army. Felicitation of selectedstudents on 6th Dec.2022 and they share their experence with students.



पुढारी

# एसव्हीकेटीच्या चार विद्यार्थ्यांची 'अग्निवीर' म्हणून निवड

**नाशिकरोड : पुढारी वृत्तसेवा**

येथील श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया महाविद्यालयातील एनसीसी विभागातील चार विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड झाली. 'अग्निवीर' म्हणून त्यांना देशाची सेवा करण्याची संधी मिळणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सोमवारी (दि. ५) प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांच्या हस्ते सत्कार झाला.

यामध्ये नॅशनल कॅडेट कोर विभागातील चार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संतोष मोजाड, गणेश राव, सौरव शिंदे, पवन जाधव अशी अग्निवीर म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे आहेत. प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांच्या हस्ते अग्निवीरांचा सत्कार झाला. यावेळी प्राचार्य डॉ. काळे म्हणाले की, अग्निवीर म्हणून निवड झालेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एनसीसीमधील 'बी' प्रमाणपत्र आणि 'सी' प्रमाणपत्र यांचा अधिकारी बनण्यासाठी कसा उपयोग होईल, याकडे लक्ष द्यायला हवे, असे त्यांनी म्हटले.

प्रास्ताविकात लेफ्टनंट पी. सी. गांगुर्डे यांनी अग्निवीर म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी सेनेत कायम होण्यासाठी प्रयत्न करावेत, व्यासपीठावर उपप्राचार्य डी. टी. जाधव होते. कॅडेट कांचन डांगे यांनी सूत्रसंचालन केले. कॅडेट सानिका खेलूकर यांनी आभार मानले.

नाशिकरोड : भारतीय लष्करात अग्निवीर म्हणून निवड झालेल्या एसव्हीकेटी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सत्काराप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एस. काळे. समवेत उपप्राचार्य डी. टी. जाधव, लेफ्ट. पी. सी. गांगुर्डे.

My Nashik Edition
Dec 6, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

**6. Problems encountered and resources required:-**

- To attract more students in military services.
- To counsel parents of students who intend to pursue their dreams in military services.